# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः19.01.2025** **वारःरविवार**

---

ठळक बातम्या

• स्वामीत्व योजनेंतर्गत 65 लाख लाभार्थ्यांना मालमत्ता पत्रकाचं पंतप्रधानांच्या हस्ते वितरण

• पंतप्रधान नरेंद्र मोदी आज आकाशवाणीवरून 2025 मधील पहिल्या मन की बात कार्यक्रमातून आपले विचार मांडणार

• जागतिक बँकेद्वारे भारतासाठी 6 पूर्णांक 7 टक्के वृद्धि दर राहण्याचा अंदाज, भारत पुढील दोन आर्थिक वर्षांसाठी सर्वात वेगान वाढणारी मोठी अर्थव्यवस्था म्हणून आर्थिक पटलावर वर्चस्व गाजवणार असल्याचा अहवाल

आणि

• विश्व करंडक खो-खो स्पर्धेत भारतीय पुरुष आणि महिला संघांचा विजेतेपदासाठी नेपाळ संघांसोबत सामना

मालमत्ता-पत्रक

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वामित्व योजनेंतर्गत 65 लाखांहून अधिक लाभार्थींना मालमत्ता पत्रकाचं वितरण काल दूरस्थ प्रणालीद्वारे केलं. 10 राज्य आणि 2 केंद्र शासित प्रदेशातील 50 हजारांहून अधिक गावांमध्ये मालमत्ता पत्रकाचं वितरण करण्यात आलं. यावेळी बोलताना पंतप्रधानांनी ग्रामीण अर्थव्यवस्थेसाठी हा दिवस ऐतिहासिक असल्याचं सांगितलं. स्वामित्व योजना लागू झाल्यापासून गेल्या पाच वर्षांत दोन कोटी 25 लाखांहून अधिक मालमत्तेची कागदपत्र देण्यात आली आहेत. पंतप्रधान म्हणाले की, सरकार ग्रामस्वराज्याची तृणमूल स्तरावर अंमलबजावणी करण्यासाठी प्रामाणिकपणे काम करत आहे. स्वामित्व योजनेमुळे ग्रामविकासाच नियोजन आणि अंमलबजावणीत लक्षणीय सुधारणा झाली असून यामुळं देशातील शंभर लाख कोटींची आर्थिक द्वारं खुली होणार असून ही योजना लोकांच्या आर्थिक सक्षमीकरणात महत्त्वाची भूमिका बजावणार असल्याच त्यांनी अधोरेखित केल. पंतप्रधान म्हणाले की, स्वामित्व

योजनेमुळे ग्रामीण अर्थव्यवस्था विकासाचा मुख्य आधारस्तंभ बनेल. सरकार त्यासाठी काम करत आहे. आत्तापर्यंत 23 कोटी भू आधार क्रमांक देण्यात आले आहेत. महिला विकसित भारताच्या उभारणीमध्ये महत्वाची भूमिका बाजावतील असं विश्वास यावेळी मोदी यांनी व्यक्त केला. महिलांचं सक्षमिकरण हे आपल्या सरकारचं उदिष्ट असून मोठ्या योजनांच्या केंद्रस्थानी महिलांना ठेवणार असल्याचंही ते म्हणाले. यावेळी मोदी यांनी काही लाभार्थ्यांसोबत संवाद साधला.

महाराष्ट्रातील वर्धा जिल्ह्यातील पवनार इथल्या लाभार्थी वर्षा मंगळुरकर यांनी सांगितलं की त्यांचं कुटुंब एक उपहारगृह चालवतं, त्यासाठी कर्ज घेण्याकरिता या कार्डचा उपयोग होईल...

झाडगाव इथल्या आणखी एक लाभार्थी सीमा कुरुडकर यांना मुलांना चांगलं शिक्षण देण्याची आणि स्वतःचा एक लहानसा व्यवसाय सुरू करण्याची आशा आहे...

मन की बात

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज सकाळी 11 वाजता आकाशवाणीवरून मन की बात या कार्यक्रमांतर्गत देश विदेशातील नागरिकांशी संवाद साधणार आहे. मन की बात कार्यक्रमाचा हा 118 वा भाग सून 2025 या वर्षातील या कार्यक्रमाचा हा पहिलाच भाग असणार आहे. हा कार्यक्रम आकाशवाणी आणि दूरदर्शन केंद्रावरून तसंच ए आय आर न्यूज वेब साईट आणि न्यूज ऑन ए आय आर या मोबाइल ॲप वरूनही ऐकता येणार आहे. याबरोबरच सर्व आकाशवाणी केंद्र,डीडी न्यूज, पंतप्रधान कार्यालय, तसंच सूचना आणि प्रसारण मंत्रालयाच्या यू ट्यूब चॅनल वरही ऐकता येणार आहे. मन की बात कार्यक्रमाच्या हिन्दी प्रसारणानंतर लगेचच आकशवाणी वरुन हा कार्यक्रम सर्व प्रादेशिक भाषांमध्ये प्रसारित केला जाणार आहे.

मुख्यमंत्री  दौरा

स्वित्झर्लंडमधील दावोस इथं विश्व आर्थिक मंचाच्या वतीनं आयोजित गुंतवणूक परिषदेत सहभागी होण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस काल रात्री रवाना झाले. डाटा केंद्रं, स्वयंचलित वाहनं, सेमीकंडक्टर, विद्युत वाहनं, इलेक्ट्रॉनिक्स, पोलाद, अन्नप्रक्रिया, वस्त्रोद्योग, औषधं आणि पायाभूत सुविधा क्षेत्रात मोठ्या संख्येनं सामंजस्य करार या दौऱ्यात होणार आहेत.

जीडीपी

जागतिक बँकेन भारतासाठी 6 पूर्णांक 7 टक्के वृद्धि दर राहण्याचा अंदाज वर्तवला आहे. जागतिक वाढीच्या तुलनेत हा दर 2.7 टक्क्यांपेक्षा जास्त आहे. जागतिक बँकेच्या जागतिक

आर्थिक संभाव्यता अहवालाच्या ताज्या आवृत्तीत म्हटल आहे की भारत पुढील दोन आर्थिक वर्षांसाठी सर्वात वेगान वाढणारी मोठी अर्थव्यवस्था म्हणून आपला दर्जा कायम ठेवून जागतिक आर्थिक पटलावर वर्चस्व गाजवेल. जीईपी अहवालात या असाधारण गतीच श्रेय सेवा क्षेत्रातील भरभराट आणि परिवर्तनकारी सरकारी उपक्रमांमुळे पुनरुज्जीवित झालेल्या उत्पादन वाढीला देण्यात आलं आहे.

भारतीय गतिशीलता बाजार

2030 पर्यंत भारतीय गतिशीलता म्हणजे मोबिलिटी उद्योग दुप्पट होऊन 600 अब्ज अमेरिकन डॉलर्सच्या पुढे जाण्याची अपेक्षा असल्याचं गुगल आणि बोस्टन कन्सल्टिंग ग्रुपच्या अहवालात म्हटलं आहे. थिंक मोबिलिटी रिपोर्टनुसार, 2030 पर्यंत इलेक्ट्रिक, शेअर्ड आणि कनेक्टेड मोबिलिटी यासारखी  उदयोन्मुख महसूल क्षेत्रं एकंदर बाजारपेठेत 100 अब्ज अमेरिकन डॉलर्सच योगदान देण्यास सज्ज आहेत, तर बहुतांश महसूल अभिजात घटक, नवीन ICE वाहनांची विक्री, वित्त आणि विमा इत्यादी अभिजात महसूल संचयामधून येईल. या अभ्यासात सहभागी झालेल्यापैकी अंदाजे 51 टक्के प्रतिसादकर्त्यांनी इलेक्ट्रिक वाहनांच्या चार्जिंग पायाभूत सुविधांच्या अनुपलब्धता , 45 टक्के वाहनांच्या उच्च किंमती, 31 टक्के बॅटरीचं आयुष्य आणि 20 टक्के जणांनी चारचाकी  इलेक्ट्रिक वाहनांच्या विविध मॉडेल्सबाबत चिंता व्यक्त केली. अहवालानुसार, इलेक्ट्रिक वाहनांच्या विभागात निर्णय घेण्यावर प्रभाव टाकण्यात महिलाचं प्रमाण 52 टक्के आहे.  इन्फोटेनमेंट, रिअल-टाइम पार्किंग असिस्टन्स आणि अँटी-थेफ्ट फीचर्ससारख्या वैशिष्ट्यांसाठी अंदाजे 80 टक्के, तर रिमोट कंट्रोल्ससारख्या जागतिक स्तरावर लोकप्रिय संलग्न वैशिष्ट्यांची मागणी तुलनेन कमी आहे.

गाझा युद्धबंदी करार

इस्रायल आणि गाझामधील हमास यांच्यातील युद्धबंदी करार आज भारतीय वेळेनुसार दुपारी 12 वाजता लागू होईल. इस्रायलच्या संरक्षणविषयक मंत्रिमंडळानं गाझा युद्धबंदी कराराला काल मान्यता दिली. यामध्ये हमासनं ताब्यात घेतलेल्या डझनभर ओलिसांची इस्रायली तुरुंगात असलेल्या पॅलेस्टिनी कैद्यांच्या बदल्यात देवाणघेवाण आणि 15 महिन्यांपासून सुरू असलेल्या संघर्षाला तात्पुरता विराम यांचा समावेश आहे. परंतु युद्धबंदी लागू होण्याच्या काही तास आधी, इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू म्हणाले की गाझा युद्धबंदी करार तात्पुरता असू शकतो आणि इस्रायलला गाझा लढाई पुन्हा सुरू करण्याचा अधिकार आहे. त्यांनी हमासला आज पहिल्या टप्प्यात सोडण्यात येणाऱ्या 33 ओलिसांची यादी देण्यास सांगितले आहे. कराराच्या पहिल्या टप्प्याअंतर्गत, हमासने 33 ओलिसांची सुटका करण्यास सहमती दर्शविली आहे, यात मुले, महिला आणि 50 वर्षांवरील व्यक्तींचा समावेश आहे. त्या बदल्यात, इस्रायल हमासने

सोडलेल्या प्रत्येक महिला इस्रायली सैनिकासाठी 50 पॅलेस्टिनी कैद्यांना आणि इतर महिला ओलिसांसाठी 30 कैद्यांना सोडेल.

अमित शहा

केंद्रीय गृह आणि सहकारिता मंत्री अमित शहा यांनी जम्मू मधील राजौरी जिल्ह्यातील राहस्यमयी मृत्यूंच्या कारणांचा तपास करण्यासाठी एक आंतरमंत्रालयीन समिति गठित करण्याचे आदेश दिले आहेत. गृह मंत्रालयाच्या नेतृत्वामध्ये ही समिति  गेल्या 6 आठवड्यांमध्ये झालेल्या मृत्यूच्या तीन घटनांचा तपास करण्यासाठी तिथल्या गावांचा दौरा करणार आहे.

दिल्ली-निवडणूक

दिल्ली विधानसभेच्या 70 जागांसाठी 1 हजार 521 उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत. निवडणूक आयोगानं दिलेल्या माहितीनुसार काल उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी 680 अर्ज दाखल झाले. नवी दिल्ली विधानसभा मतदार संघात सर्वाधिक उमेदवारी अर्ज दाखल झाल्याची माहिती निवडणूक आयोगानं दिली आहे. उमेदवारी अर्जनची छाननी करण्यात आली असून उद्या उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा शेवटचा दिवस आहे.

खो-खो

खो खो विश्वचषक स्पर्धेत, भारतीय पुरुष संघानं काल नवी दिल्लीत दक्षिण आफ्रिकेला 62-42 गुणांनी हरवून अंतिम फेरी गाठली. आता विजेतेपदासाठी त्यांचा सामना नेपाळसोबत होईल. तत्पूर्वी, भारतीय महिला संघानं विजयी घोडदौड सुरू ठेवत दक्षिण आफ्रिकेला 66-16 अशा फरकानं पराभूत केलं. आता भारतीय महिला संघ देखील अंतिम फेरीत नेपाळसोबत लढणार आहे.

याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.